**नि.फौ.ख.क्र.४५/२०१९**
**शासन वि. इजाज अहमद**
**नि.क्र.५९**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४**

नावः अब्दूल रफीक अब्दूल रशीद,

वयः ५० वर्ष, धंदाः वेल्डर,

पत्ताः कामठी, तह. कामठी, जि. नागपूर

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.४ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.व्ही.तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

१. मी आरोपी यांना ओळखत नाही. मी अब्दूल रशीद अब्दूल रहीम पटेल (सा.क्र.३) यांना ओळखतो. पोलीसांनी मला ०८ वर्षांपूवी डोरली येथील रशीद पटेल याच्या शेतात बोलाविले होते. पोलीसांनी तेथे कापलेल्या झाडाचे मूळ दाखविले व त्यानंतर लिखापडी करुन पंचनामा तयार केला व माझी सही घेतली. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६०** देण्यात आला.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी क्र.१ व २ तर्फे श्री पी.एस.सायरे वकील साहेब यांच्यामर्फत उलटतपास शपथेवर सुरुः–**

२. मी वर्ग २ पर्यंत शिकलो आहे. मला मराठी लिहीता व वाचता येत नाही. मी सलीम अब्दूल करीम पटेल याला ओळखत नाही. मी रशीद पटेल यांच्यासोबत आज रोजी न्यायालयात आलो. हे म्हणणे खरे नाही की, मी डोरली येथे पंचनाम्याकामी आलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता समन्स दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, गर्दीमध्ये पोलीसांनी

मला सही करण्यास सांगितले व मी सही केली. मी ०४:०० ते ०५:०० वाजताच्या दरम्यान सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्यांच्यासोबत न्यायालयात आलो त्याच्यासोबत माझे चांगले संबंध आहे. साक्षीदार सांगतो की ओळखीचे संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात लिहीलेल्या घटनास्थळाचे चतुर्सिमा सांगू शकत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मला उत्तर–दक्षिण समजत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यात किती झाड लिहीले आहे हे मी सांगू शकत नाही. कथित घटनेमध्ये फिर्यादी कोण आहे ते मला माहीत नाही. तसेच ते शेत किती ऐकर होते हे मला माहीत नाही. कथित घटनास्थळावर कोणते पीक होते हे मी सांगू शकत नाही. आज रोजी घटनास्थळ पंचनाम्यात पूर्ण मजकूर काय लिहीला आहे, ते मी वाचून पाहील्या शिवाय सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासामक्ष कोणताही पंचनामा तयार करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी रशीद पटेल याच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.05.15 19:58:20 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.05.15 19:58:24 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः १५/०५/२०२५